**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३१/२०१८ मध्ये निशाणी क्र. २५ खालील आदेश.**

वादींनी सदरचा अर्ज हा सदर दाव्यात न्यायालयीन आयुक्ताची/कोर्ट कमिशनरची नेमणुक होउन मिळणेबाबत दाखल केला आहे. वादींनी सदर दावा हा ठराव करून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. वादींचे अर्जातील कथन की, सदर दावामिळकत ही पुर्वीपासुनच वादींच्या कब्जेवहीवाटीत आहे. परंतु, सदर कब्जेवहीवाटीबाबत सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. सबब, वादींनी सदर अर्जान्वये, सदर दाव्यात न्यायालयीन आयुक्ताची/कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करून हरकत घेतली आहे. प्रतिवादींनी सदर अर्ज हा पुरावा तयार करण्यासाठी दाखल करण्यात आला असुन वादींचा दावामिळकतीशी काही संबंध नाही व दावामिळतीवर कब्जाही नाही, असे नमुद केले आहे. त्यामुळे वादीचा अर्ज योग्य व कायदेशीर नसल्याने नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

३. दोन्ही पक्षांतर्फे विद्वान वकिला युक्तीवाद ऐकला. वादींच्या व प्र.वादींच्या वकीलांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे व म्हणणेप्रमाणे युक्तिवाद केला. वादंनी सदरचा दावा हा प्र.वादीं विरूध्द निरंतर ताकीदीकरिता व अ.क्र. ३७६/१९२० रोजी नोंदणी झालेले खरेदीखत दस्त हा धोखाधडीने व फसवणुक करून, घेतला आहे व तो वादींवर बंधनकारक नाही, असा ठराव होउन मिळणेकरीता दाखल केला आहे. वादींचे सदर अर्जामधील कथन की, सदर दावामिळकत ही पुर्वीपासुनच त्यांच्या ताब्यात व कब्जेवहीवाटीत आहे. वादींच्या दाव्यातील विनंती व दाव्याचे स्वरूप विचारात घेता, सदरचा अर्ज हा दावामिळकतीची सत्य परिस्थिती जाउन घेण्याकरीता दाखल केला आहे, म्हणजे वादींनी सदरचा अर्ज हा पुरावा गोळा करण्यासाठी दाखल केला आहे. वादींना दावामिळकत त्यांच्या ताब्यात व कब्जात आहे हे दाखविण्यासाठी न्यायालय न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करू शकत नाही. त्यामुळे वरील बाबींवरून वादींचा अर्ज हा नामंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**CNR NO. MHNS1800664-2018**

## —:: **आदेश** ::—

१. अर्ज ना—मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( डि.एम.गित्ते )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— २३/११/२०२१.